# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ७२/२०१४-१५/२५९ दिनांक : २०.१२.२०१४

**<u>आदेश केस क्र. ७२/१४-१५</u>**

श्री. बाबु तुकाराम निंबाळकर, .. अर्जदार
१/५५७, जगताप तालीम, नदीवेस, इचलकरंजी,
जि.कोल्हापूर.

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता, .. विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी.

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय अ, इचलकरंजी.

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. बी.जी.पवार,अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

तक्रारदार श्री. बाबु तुकाराम निंबाळकर यांनी वितरण कंपनी अ उप विभागीय कार्यालय, इचलकरंजी यांचेविरुध्द मंचाकडे दि. २७.१०.२०१४ रोजी गाऱ्हाणे दाखल केले त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार यांनी दि. १२.११.२०१३ रोजी ३ अश्वशक्ती वीज जोडणी मिळणेसाठी वि.प.कडे अर्ज केला.फर्म कोटेशनचे रु.२२५६/- दि.३१.०१.२०१४ रोजी भरले. तक्रारदार ग्राहकास दि.३१.१०.२०१४ रोजी कपॅसिटर टेस्टिंग रिपोर्ट मिळाला.

तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार ते गट क्र. २०५ मध्ये ६० वर्षापासून संरक्षित कूळ म्हणून कायमपणे शेत जमीन कसत आहेत तशी नोंद ७/१२ पत्रकी तशी नोंद आहे. त्यांना महाराष्ट्र शासन पाट बंधारे विभाग, कोल्हापूर यांचा पंचगंगा नदीवर विद्युत उपसा यंत्र बसविणेस परवानगी पत्र क्र. २०१३ दि. २३.०८.२०१३ नुसार मिळाली आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार ७/१२ उताऱ्यावरील मूळ मालकापैकी १ हिस्सेदार याने वीज जोडणीस हरकत घेतली त्या हरकतीत कांही तथ्य नाही. हरकत घेणार श्री. संदीप मुगेंद्र सुलतानपुरे हे भोगवटादार असले तरी जमीन कसणाऱ्यास शेतीसाठी विद्युत पुरवठा मिळविण्याचा हक्क आहे. वितरण कंपनीने दि. ०९.१०.२०१४ चे पत्र क्र. २४११ नुसार श्री. सुलतानपुरे यांचे रु. २००/- चे स्टँप पेपरवर ना हरकत घेणेबाबत कळविले आहे ते त्यांना मान्य नाही. मंचाकडे वीज जोडणी सत्वर मिळावी व विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २८.११.२०१४ च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी वीज जोडणीसाठी अर्ज केल्याचे मान्य केले. त्यासोबत कागदपत्रे जोडली असल्याचा उल्लेख केला आहे. श्री. संदीप मृगेंद्र सुलतानपुरे यांनी दि .०३.०३.२०१४ च्या पत्राने तक्रारदारास वीज पुरवठा देण्याबाबत हरकत घेतल्याने त्या बाबत अर्जदार यांनी दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्यावरील कॉलममध्ये कूळ / वहिवाटदार म्हणून त्यांचा उल्लेख असून शेतसारा भरल्याची पावतीही हजर केली आहे. वि.प.चे स्थानिक अधिकारी यांनी कंपनीचे विधी सल्लागार यांचे अभिमत घेऊन तक्रारदार यांना श्री. संदीप सुलतानपुरे, श्री. रंगराव बाळा ढोले यांचे रु. २००/- च्या स्टँपेपरवर संमत्तीपत्र सादर करण्यास कळविले. तक्रारीसोबत दि. २२.०८.२०१४ चे लिगल ॲडव्हायजर, पुणे रिजन, पुणे यांचे पत्र जोडले आहे.

प्रस्तुतची तक्रार सुनावणीस मंचासमोर दि. २०.११.२०१४ रोजी घेण्यात आली. तक्रारदार ग्राहक स्वतः उपस्थित. वि.प.तर्फे श्री.आय.एन.चव्हाण, उप कार्यकारी अभियंता, श्री. एस.डी.जाधव, सहाय्यक अभियंता उपस्थित. तक्रारदार यांनी आपण संरक्षित कूळ/ वहिवाटदार असल्याने महाराष्ट्र शासन पाट बंधारे विभाग, कोल्हापूर यांनी पंचगंगा नदीवर विद्युत उपसा यंत्र बसविणेस परवानगी दिली असल्याने विद्युत पुरवठा मिळावा अशी मागणी केली आहे. वितरण कंपनीने मागणी केलेले संबंधित मालक व श्री. रंगराव बाळा ढोले यांच्या समत्तीची गरज नाही. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ग्राहकाने दि. ०९.१०.२०१४ च्या पत्रास कुठलेही उत्तर पाठविले नाही, जमिनीचा विभागणी नकाशा सादर केलेला नाही. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी लिगल ॲडव्हायजर यांच्या पत्रातील सूचनांनुसार कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर तक्रारदारास विद्युत पुरवठा करण्याची तयारी दर्शविली.

तक्रारदार यांस मंचाने संरक्षित कूळ असल्याबद्दलची कागदपत्रे व कुळाचा मालकी हक्क फेरफार बदल करुन कागदपत्रे सादर करण्यास सांगितले, परंतु तक्रारदार यांनी वारसाहक्कमाने मयत कूळ कै.तुकाराम शिवराम निंबाळकर यांचे ऐवजी आपले नांवे क्र.१३६४४ दि.०४.०४.१९७८ चा फेरफार उतारा जोडला आहे. तक्रारदार यांनी नकाशाची व फेरफार पत्रकाची सर्टीफाईड कॉपी संबंधित खात्याकडून हजर करण्याऐवजी कॉपीची कॉपी विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांनी प्रमाणित केलेली प्रत हजर केली आहे. वि.प.चे अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्या दि.२८.११.२०१४ च्या मंचाला अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये तक्रारदाराने हजर केलेल्या फेरफार पत्रक व समजुतीचा नकाशा यांच्या छायाप्रतीवर कोणच्याही सह्या नाहीत अथवा सत्यप्रत म्हणून कोणाची सही नाही, तसेच अन्य एका नकाशावर कोर्ट कमिशनरची सही आहे व त्यावर गट क्र. २०५, गट क्र. ११९ चा उल्लेख आहे, परंतु यामध्ये तक्रारदारांचा हिस्सा कोणता आहे याचा बोध होत नाही असे नमूद केले आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहेत.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी देण्याचे आदेश वितरण कंपनीस देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे विलंबापोटी भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

कारणमिमांसा

वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकाने वीज मागणीसाठी अर्ज केला, चाचणी अहवाल दिला, जल संपदा विभाग यांची पंचगंगा नदीवर पाणी उपसा यंत्र बसविणेची परवानगी इत्यादी कागदपत्रे हजर केल्याचे मान्य केले. परंतु उप कार्यकारी अभियंता, इचलकरंजी यांना अग्रेषित केलेल्या दि. ०१.०३.२०१४ च्या पत्राने श्री. संदीप मुगेंद्र सुलतानपुरे यांनी त्यास हरकत घेतली. त्या पत्राची झेरॉक्स प्रत हजर केली आहे. गट क्र. २०५ चे क्षेत्र २.२५ आर इतके आहे. त्या हरकतीमध्ये अर्जदार यांनी मालकीबद्दल आक्षेप घेतला आहे. या ठिकाणी तक्रारीसोबत हजर केलेला २०१३-१४ चा ७/१२ उतारा पहाता, कष्ट करण्याचे नांव श्री. रंगा ढोले, बाबु तुकाराम निंबाळकर असे दिसते. तक्रारदार यांची नांवे इतर हक्कात कूळ म्हणून ७/१२ वर आहेत. एक हरकतदार श्री. संदीप मुगेंद्र सुलतानपुरे मालकी हक्कात दाखविले आहे. वितरण कंपनीच्या वीज मागणी अर्जातील व धोरणात्मक निर्णयानुसार वाहिवाटदार किंवा क्षेत्रधारक यांस विद्युत पुरवठा करता येतो. या ठिकाणी तक्रारदार यांस जलसंपदा विभाग यांनी पाणी उपसा करण्याची परवानगी दिली आहे, मंजुरी दिली आहे. त्या पत्रातील उल्लेखानुसार ग्राहकाचे ७० आर असे क्षेत्र आहे. त्यामध्ये उन्हाळी पिकास परवानगी आहे. अर्जदार स्थानिक बागायतदार असल्याने त्यांना गट क्र. २०५ मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंपाने पाणी उपसा करण्यास कांही अटीवर परवानगी दिली आहे. तथाकथित हरकतदार श्री. संदीप मुगेंद्र सुलतानपुरे यांनी या परवान्यास आक्षेप घेतलेला नाही. ७/१२ उताऱ्यातील नोंदी व फेरफार पत्रकातील उल्लेख यावरुन अर्जदार हे गट क्र. २०५ मध्ये वाहिवाटदार आहेत व दिनांक ०९.१२.२०१४ ला दाखल केलेल्या कागदपत्रावरुन, कोर्ट कमिशनरची सही असलेल्या नकाशावरुन गट क्र. ११९ मध्ये खोदलेली जमिन वेगळी दाखविली आहे व गट क्र. २०५ पैकी १/२ हिस्स्यामध्ये कांही खोदकाम केल्याचे दिसत आहे. अर्जदार व दुसरे वहिवाटदार श्री. रंगराव बाळा ढोले यांचे वेगळे हिस्से वहिवाटीप्रमाणे दिसतात. या ठिकाणी प्रथमदर्शनी जमिन मालक श्री. सुलतानपुरे व श्री. ढोले यांच्या हरकतीत कांही तथ्य नाही. मालकी हक्कासंबंधात श्री. सुलतानपुरे यांचे कांही आक्षेप असतील तर ते योग्य त्या न्यायालयात दाद मागू शकतात. त्यामुळे अर्जदारास विद्युत पुरवठ्यापासून वंचित ठेवता येणार नाही. मुद्दा क्र. १ चे उत्तर ' होय ' असे देण्यात येत आहे. वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता, इचलकरंजी यांनी अर्जदार ग्राहकास विद्युत पुरवठा द्यावा असे आदेश देण्यात येत आहेत.

विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील कलम ८.८ नुसार ' प्रथम येणाऱ्यास प्रथम ' या तत्वाने अर्जदारास विद्युत पुरवठा देण्याबाबत कार्यवाही करावी व मंचास तसा अहवाल द्यावा. विलंबापोटी भरपाईबाबत नवीन कृती मानके विनियम २०.०५.२०१४ नुसार अर्जदार ग्राहक गाऱ्हाणे दूर झाल्यानंतर वितरण कंपनीकडे मागणी करु शकतो. विलंबापोटी भरपाईची मागणी या तक्रारीत तूर्तास मंजूर करता येणार नाही असे निरीक्षण नोंदवून भरपाईची मागणी निकाली काढण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१. तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वितरण कंपनी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, अ उप विभाग, इचलकरंजी यांनी विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील कलम ८.८ नुसार अर्जदाराने सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांस वीज जोडणी द्यावी. तसा अहवाल मंचास द्यावा.

३. ग्राहकाची भरपाईची मागणी निकाली काढण्यात येत आहे.

४. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा.विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : (बी.जी. पवार)

अध्यक्ष

जी.बी. पानकर, सदस्य सचिव : सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.